ISSN : 0976-0385 R.N.I.Regd.No.MAHBIL/2009/37456

शिक्षणातील मर्मदृष्टी

UGC APPROVED

Shikshanteel Marmdrushti

A Peer-reviewed Journal For Teacher Education

शिक्षणातील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन यांना वाहिलेले नियतकालिक

Vol.: 9th | Issue : 4th | Quarterly : January To March 2018

- Mahatma Gandhi: World Leader
- Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA)
- Techniques of Evaluation
- Study of Religious Value among Violent and Non-violent Male Offenders
- संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी अभ्यास
- परिसरातील जैवविविधतेची जाणीव जागृती – एक अभ्यास
- Relationship between Personality and Marital adjustment among arranged marriage and love marriage couples
- Study of Social Value among Violent and Non-violent Offenders

2018

अनुक्रमनिका

१.	**Mahatma Gandhi: World Leader** Prof., Dr. V. P. Shikhare	०५
२.	**Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA)** Prof. Dr. Kishor Chavan	०८
३.	**Techniques of Evaluation** Prof., Dr. Ramprasad S. Kale, Prof., Dr. Digamber Darekar	११
	संशोधनात्मक लेख	
४.	**Study of Religious Value among Violent and Non-violent Male Offenders** Prof., Dr. Digamber Darekar	१७
५.	**संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी अभ्यास** डॉ. संजीवनी राजेश महाले, डॉ. विजया विनायक पाटील	२०
६.	**परिसरातील जैवविविधतेची जाणीव जागृती – एक अभ्यास** प्रा. कविता प्रदीप तोटे, डॉ. शोभा विजयकुमार कागदे	२५
७.	**Relationship between Personality and Marital adjustment among arranged marriage and love marriage couples** Dr. P. V. Rasal, Smt. S. S. Kshirsagar	२९
८.	**Study of Social Value among Violent and Non-violent Offenders** Dr. Ramprasad S. Kale, Dr. DigamberDarekar	३४
	शैक्षणिक घडामोडी आणि बातम्या	३७

या अंकातील लेखकांचे विचार स्वतंत्र आहेत.
त्यास संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

संशोधनात्मक लेख

5

संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी अभ्यास

डॉ. संजीवनी राजेश महाले
सहयोगी प्राध्यापक

डॉ. विजया विनायक पाटील
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक

सारांश :

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रावरील संशोधन मार्गदर्शकाचे तीन दिवशीय संशोधन मार्गदर्शनाबाबत प्रशिक्षण कार्यक्रम विद्यापीठात घेण्यात आला. व्याख्यान पद्धतीचा वापर न करता प्रेरक आणि सहकार्यात्मक पद्धतीने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षण उपयुक्तता, नवीन माहिती संशोधन मार्गदर्शनसाठी उपयुक्तता आणि सत्रांची कंटाळवाणे ह्या घटकांनुसार पडताळणी करण्यात आली. सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या मते हा प्रशिक्षण कार्यक्रम परिणामकारकता राबविण्यात आलेला होता.

प्रस्तावना :

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. विविध शिक्षणक्रमांची अंमलबजावणी ही पारंपरिक विद्यापीठांतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रामार्फतच केली जाते. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेत एम.ए. (शिक्षणशास्त्र) हा पदव्युत्तर पातळीवरील शिक्षणक्रम राबविला जातो. ह्या शिक्षणक्रमांतर्गत 'संशोधन' हा भाग महत्त्वाचा आहे. कारण त्यास अधिक भारांश देण्यात आलेला आहे. 'संशोधन मार्गदर्शनासाठी प्रत्येक विद्यापीठाची आपापली स्वतंत्र अशी नियमावली आहे. मुक्त विद्यापीठाच्या एम. ए. (शिक्षणशास्त्र) ह्या पदव्युत्तर पातळी वरील संशोधन मार्गदर्शक हे एम. फिल/पीएच. डी. पदवीधारक असतात. त्यांना अध्यापनाचा आणि संशोधन मार्गदर्शनाचा अनुभव असतो व ते 'संमंत्रक' म्हणून ही कार्य करीत असतात. मुक्त विद्यापीठात 'संशोधन कार्य' ह्या घटकांसाठी गुणवत्ता राखण्यासाठी एम.ए. (शिक्षणशास्त्र) च्या संशोधन अहवालांचे परिशीलन केले जाते. ह्या परिशीलनामध्ये जवळ जवळ सर्व अभ्यासकेंद्रावरील संशोधन अहवालांचे समिती मार्फत पुनरमूल्यमापन केले जाते. परिशीलनाच्या वेळी संशोधना अहवालाच्या गुणदानात अभ्यासकेंद्रावर एकवाक्यता दिसून आली नाही. तसेच संशोधनाच्या गुणवत्तेचा विचार करता खूपच त्रुटी आढळल्या. त्यावरून संशोधन मार्गदर्शनासाठी सर्व अभ्यास केंद्रावर एकवाक्यता व गुणवत्ता राहावी ह्यासाठी संशोधन मार्गदर्शकांचे प्रशिक्षण घेण्याची निकड भासली. व त्यानुसार एक प्रशिक्षण कार्यशाळा विद्यापीठात घेण्यात आला. ह्या प्रशिक्षण कार्यक्रम कार्यनितीची परिणामकारकता पाहण्यासाठी ही संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले.

संशोधन शीर्षक :

एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांच्या संशोधन मार्गदर्शकांसाठी आयोजित केलेल्या संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी

अभ्यास संशोधनाची उद्दिष्टे :

१) संशोधन, मार्गादर्शक उदबोधन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या घटकांचा शोध घेणे.

२) सहकार्यात्मक प्रशिक्षण कार्यनितीची उपयुक्तता अभ्यासणे.

३) संशोधन मार्गदर्शन प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

संशोधनाची चले :

स्वाश्रयी चल - प्रशिक्षण कार्यक्रम.

आश्रयी चल - प्रशिक्षणाची उपयुक्तता, संशोधनाबाबत नवीन माहिती, मुक्त विद्यापीठातील एम.ए. शिक्षणशास्त्र आणि इतर विद्यापीठातील पदव्युत्तर पातळीवरील संशोधन मार्गदर्शन.

संशोधन कार्यपद्धती :

प्रस्तृत संशोधनासाठी 'सर्वेक्षण संशोधनपद्धती' निश्चित करण्यात आली. कारण प्रशिक्षण कार्यक्रमानंतरची परिणामकारकता पाहण्यासाठी घडलेल्या कार्यवाहीचे तपशीलवार सर्वेक्षण करणे गरजेचे होते.

प्रशिक्षण पूर्वतयारी:

• संशोधन अहवालाच्या परिशीलनाच्या वेळी संशोधन अहवालामध्ये आढळणाऱ्या त्रुटी, संशोधन मार्गदर्शकाची त्या त्या घटकाविषयीची अनभिज्ञता किंवा अपुरे ज्ञान ह्यावरून काही घटकांची निवड करण्यात आली. संपूर्ण संशोधन अहवालासाठी उपयुक्त अशा विविध घटक अशा दोन्ही पद्धतीने एकत्रित विचार करून घटक निश्चित करण्यात आले.

• संशोधन मार्गदर्शकांच्या प्रशिक्षणासाठी वेगळी प्रशिक्षण कार्यपद्धती ठरविण्यात आली. कारण संशोधन मार्गदर्शन हे मुळातच संशोधन कार्यात अध्यापन व मार्गदर्शन करीत असल्याने त्यांना एकमार्गी (ONE-WAY) प्रशिक्षण देणे संयुक्तिक नव्हते. त्यामुळे विद्याशाखेतील प्रशिक्षक (Trainer) हा न राहता प्रेरक (Facilitator) ठेवण्यात आला. प्रत्येकाला प्रशिक्षणाचे घटक देण्यात आले.

• विद्याशाखेत प्रत्येक घटकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी प्रेरकांकडे स्वतंत्रपणे देण्यात आली. त्यांनी त्यांच्या घटकांनुसार पूर्वीच्या संशोधन अहवालातून साहित्य एकत्रित केले. प्रशिक्षणाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून विद्याशाखेत प्रेरकांची सादरीकरणे घेण्यात आली. यात प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या वेळीच्या करावयाच्या कृतींची स्पष्टता करण्यात आली, त्यांना प्रत्याभारण देण्यात आले.

• पूरक म्हणून एक पुस्तिकाही देण्यात आली. या पुस्तिकेत प्रत्येक संशोधनाच्या घटकाविषयी काही प्रश्न देण्यात आले. संशोधन अहवालातील त्या त्या घटकातील सतत होणाऱ्या चुका किंवा त्रुटी यांचे नमुने देण्यात आले. प्रत्येक घटकाअंतर्गत कृती देण्यात आल्या.

प्रशिक्षण कार्यनिती:

प्रेरकाने प्रशिक्षण कार्यनिती संशोधन अहवालात झालेल्या चुका, त्रुटी, ह्या प्रत्यक्ष न दाखवता त्या चर्चे साठी ठेऊन त्यावर प्रश्न उपस्थित केले. ह्या प्रश्नांवर सर्व सहभागी संशोधन मार्गदर्शकांमार्फत चर्चा घडवून आणली. पुस्तिकेतील कृती सोडविण्यासाठी त्यांना उद्युक्त करण्यात आले. संशोधन मार्गदर्शकांना त्या त्या घटकांवर असलेल्या प्रश्नावर एकत्रितपणे चर्चा करून अंतिम निर्णय सर्वानुमते घेण्यात आले. ही सर्व कार्यनिती सहकार्यात्मक अध्ययन या तत्वावर आधारित होती.

प्रशिक्षणोत्तर कृती:

संशोधन मार्गदर्शकाकडून प्रशिक्षणाची उपयुक्तता आणि परिणामकारकता पाहण्यासाठी प्रशिक्षणानंतर पदनिश्चयन श्रेणी देण्यात आली. त्या श्रेणीच्या आधारे सामग्री एकत्रित करण्यात आली.

नमुनानिवड:

संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण २१ अभ्यासकेंद्रावरील प्रत्येकी ५ समंत्रक / संशोधन मार्गदर्शक कार्यरत आहे. त्यातील प्रत्येक अभ्यासकेंद्रवरून ३ संशोधन मार्गदर्शक येणे अपेक्षित होते. त्यापैकी जवळजवळ ६३ संशोधन मार्गदर्शकांपैकी २० मार्गदर्शक प्रशिक्षणसाठी उपस्थित राहिले असा एकूण ३०% नमुना हा संशोधनासाठी निश्चित करण्यात आला.

संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन मार्गदर्शकांकडून प्रशिक्षणाची परिणामकारकता पाहण्यासाठी पदनिश्चित श्रेणी तयार करण्यात सदर श्रेणी तीन बिंदू श्रेणी प्रमाणे विकसित करण्यात आली. त्यात एकूण ५ मुद्दे होते.

सामग्रीचे विश्लेषण:

संशोधन मार्गदर्शकांकडून प्रशिक्षणाची परिणामकारकता पाहण्यासाठी पदनिश्चित श्रेणीवरून सामग्री एकत्रित करण्यात आली. त्या सामग्रीचे विश्लेषण पुढे देण्यात आले आहे.

कोष्टक क्रमांक : १.१

प्रशिक्षण कार्यक्रम परिणामकारकता प्रत्याभरण

अ.क्र.	सत्राचे नाव	उपयुक्तता	नवीन माहिती	एम.ए.(शि) मार्गदर्शनाची भूमिका स्पष्ट	पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता
१	संशोधनाचे शीर्षक उद्दिष्टे, परिकल्पना, चले, कार्यात्मकव्याख्या	९१.६७	७७.३३	९३.७५	९५.३३
२	संबंधित साहित्याचा आढावा	८७.५	८७.५	८९.८३	८९.८३
३	संशोधन कार्यपद्धती	९५.८३	९५.३३	९५.३३	९५.३३
४	कृती संशोधन व गुणात्मक संशोधन	९१.६७	९१.६७	९३.७५	९५.३३
५	नमुना निवड	८७.५	८५.६७	९५.३३	९५.३३
६	संशोधनाची साधने	९५.८३	८९.३३	९५.८३	९३.७५
७	पथदर्शक अभ्यास	८७.५	८७.५	९३.७५	८९.८३
८	संशोधन सांख्यिकी	९५.३३	९१.६७	९१.६७	८९.३३
९	संशोधन आराखडा	९७.६७	९३.७५	९१.६७	९३.७५
१०	संशोधनातचा वापर ICT सांख्यिकी विश्लेषणासाठी software	९५.३३	८९.३३	९१.९७	९१.६७
११	संशोधनाचे अहवाल नैतिकता	९३.७५	९५.३३	९३.७५	९५.८३

टीप – आकडेवारी टक्केवारी मध्ये आहे

निरीक्षण : वरील कोष्टकांवरून –

संशोधनातील विविध संकल्पना :

१) ९२% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ७७% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९४% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए.(शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९५% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता आली

संबंधित साहित्याच्या आढावा :

१) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९०% संशोधन मार्गदर्शकांना एम.ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची समजली.

४) ९०% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

संशोधन कार्यपद्धती :

१) ९६% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए.

(शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता आली.

कृती संशोधन व गुणात्मक संशोधन बाबत :

१) ९२% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ९२% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९३% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९५% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

नमुना निवड :

१) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ८६% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

संशोधनाची साधने :

१) ९६ % संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ८९.३३% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९६% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९४% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

पथदर्शक अभ्यास :

१) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९४% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९०% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

संशोधन सांख्यिकी :

१) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ८७.५% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९४% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९०% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

संशोधन आराखडा :

१) ९८% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ९४% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९२% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९४% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

संशोधनात सांख्यिकी विश्लेषणासाठी ICT चा वापर :

१) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ८९.३३% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९२% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९२% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

संशोधन अहवाल नैतिकता :

१) ९४% संशोधन मार्गदर्शकांना उपयुक्तता वाटली.

२) ९५.३३% संशोधन मार्गदर्शकांना नवीन माहिती मिळाली.

३) ९४% संशोधन मार्गदर्शकांना एम. ए. (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शनाची भूमिका समजली.

४) ९५.८३% संशोधन मार्गदर्शकांना पदव्युत्तर पातळीवरील मार्गदर्शनाची सुस्पष्टता समजली.

निष्कर्ष :

१) एम.ए.' शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या संशोधन मार्गादर्शक उदबोधन प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त झाला.

२) सहकार्यात्मक पद्धतीने प्रशिक्षण कार्यक्रम राबविल्यामुळे संशोधन मार्गदर्शकांच्या अनुभवाचा फायदा झाला.

कोष्टक क्रमांक : १.२

प्रशिक्षणातील कंटाळवाणा टीप – आकडेवारी टक्केवारी मध्ये आहे

अ.क्र.	सत्राचे नाव	कंटाळवाणे
१	संशोधनाचे शीर्षक उद्दिष्टे, परिकल्पना, चले, कार्यात्मकव्याख्या	३७.५
२	संबंधित साहित्याचा आढावा	३७.५
३	संशोधन कार्यपद्धती	३५.६७
४	कृती संशोधन व गुणात्मक संशोधन	३७.५
५	नमुना निवड	३५.६७
६	संशोधनाची साधने	३९.५८
७	पथदर्शक अभ्यास	३९.३३
८	संशोधन सांख्यिकी	३७.५
९	संशोधन आराखडा	३७.५
१०	संशोधनातचा वापर ICT सांख्यिकी विश्लेषणासाठी software	३५.६७
११	संशोधनाचे अहवाल नैतिकता	३७.५

निरीक्षण :

१) संशोधनाची साधने हे सत्र ३९.५८ % कंटाळवाणे व संशोधन कार्यपद्धती हे सत्र ३५.६७% कंटाळवाणे झाले.

निष्कर्ष :

१) संशोधन प्रशिक्षणातील संशोधनाची साधने, पथदर्शक अभ्यास हे सत्र कंटाळवाणे वाटले.

२) नमुनानिवड आणि संशोधनात सांख्यिकी विश्लेषणासाठी ICT चा वापर ही दोन सत्रे कमी कंटाळवाणे वाटली.

निष्कर्ष :

१) संशोधन मार्गदर्शक उदबोधन प्रशिक्षण हे परिणामकारक झाले.

२) संशोधनातील विविध संकल्पनाच्या बाबतीत नवीन माहिती या घटकांबाबत टक्केवारी कमी दिसून आली. कारण हे सर्व संशोधन मार्गदर्शक होते व संकल्पनाबाबत बाबत त्यांना माहिती होती.

३) संबंधित साहित्याचा आढावा या घटकाबाबत चार ही मुद्द्यांची टक्केवारी कमी दिसून आली. कारण सर्व संशोधन मार्गदर्शकांना ह्या घटकांविषयी पूर्वानुभव पुरेसा होता.

४) नमुना निवड आणि पथदर्शक अभ्यास या घटकांबाबत उपयुक्तता आणि नवीन माहिती या घटकांबाबत टक्केवारी कमी दिसून आली. कारण ह्या घटकांविषयी त्यांना माहिती होती.

समारोप :

शिक्षणशास्त्र विद्याशाखेत शिक्षणक्रमांच्या संशोधन मार्गदर्शन उदबोधन प्रशिक्षण कार्यक्रमाची नियोजन व आयोजन प्रेरक आणि सहकार्यात्मक पद्धतीने राबविण्यात आले. संशोधन मार्गदर्शकांना त्यांच्या मार्गदर्शनातील त्रुटी न दाखवता चर्चात्मक पद्धतीने प्रत्येक घटकातील सर्वानुमते मुद्द्यांची निश्चिती करण्यात आली. प्रशिक्षण कार्यक्रम परिणामकारक झाला. प्रशिक्षणाच्या प्रत्याभरणावरून पुढील प्रशिक्षणाची गुणवत्ता राखण्यास मदत होते.

संदर्भ साहित्य :

एम.ए.(शिक्षणशास्त्र) संशोधन मार्गदर्शक अप्रकाशित प्रशिक्षण साहित्य, (२०१७) नाशिक. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

■ ■ ■